स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.**
दिनांक- ११ ऑगस्ट, २००५.

## प रि प त्र क

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-५, दिनांक-१५ मार्च, २००४ अन्वये महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे घोषणापत्र विहित करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवार प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात संपूर्ण माहिती देतातच असे नाही. कधीतरी तर चुकीची माहितीसुध्दा देण्यात येते. निवडणुका झाल्यानंतर किंवा नामनिर्देशनपत्रांचा स्वीकार झाल्यानंतर असे लक्षात आले की, त्यांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण माहिती अथवा चुकीची माहिती दिली आहे, त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम १७१जी (निवडणुकीसंदर्भात खोटी माहिती देणे), कलम १७७ (कोणत्याही प्राधिकृत अधिका-यास खोटी माहिती देणे) व कलम १८१ (शपथेवर खोटी माहिती देणे) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात यावा.

विशेषतः गुन्हेगारी पार्श्वभूमीबद्दल जी माहिती देण्यात येते त्यामध्ये ब-याचदा असे आढळून येते की, पूर्ण माहिती दिली जात नाही किंवा माहिती लपविण्यात येते. उमेदवाराच्या नांवावर दाखल असलेले दखलपात्र गुन्हे नमूद न करण्याकडे उमेदवारांचा कल असतो. अशा बाबतीत गुन्हा न चुकता दाखल करावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

C:\Documents and Settings\PATIL\My Documents\aab७७.doc